**ठळक बातम्या**

- देशातल्या सर्व बोईंग ७८७ विमानांची तपासणी करण्याचे केंद्र सरकारचे निर्देश, मृतांचे कुटुंब आणि जखमींना २५ लाख रुपयांची मदत देण्याचा एअर इंडियाचा निर्णय

- नीट युजी २०२५ चा निकाल जाहीर/ राज्यातला कृशांग जोशी देशात तिसरा

- इस्राइलने केलेल्या हल्ल्यानंतर अमेरिकेसोबत अणुकराराची चर्चा करायला इराणचा नकार

- ऑस्ट्रेलियाला नमवून जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिका विजयी

**आणि**

- ISSF विश्वचषक स्पर्धेत आर्या बोरसे आणि अर्जुन बबुताला सुवर्ण पदक

**<><><><><>**

अहमदाबाद इथं झालेल्या विमान अपघातानंतर देशात कार्यरत असलेल्या ३४ बोईंग 787 विमानांचं नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून सखोल परिक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. आतापर्यंत आठ विमानांची तपासणी झाल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के राम मोहन नायडू यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत घेतलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. या दुर्घटनेच्या सखोल चौकशीसाठी केंद्रीय गृहसचिवांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती स्थापना केली असून त्यात केंद्र आणि गुजरात राज्य सरकारमधल्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. या समितीला तीन महिन्यांत सर्वंकष अहवाल देण्याच्या सूचना दिल्याचंही नायडू यांनी सांगितलं.

या अपघातातल्या मृतांची संख्या अडीचशेच्या वर गेली आहे. या मृतांपैकी नऊजणांची ओळख पटली असून ते नातेवाईकांच्या ताब्यात दिल्याची माहिती अहमदाबादचे पोलीस उप-अधिक्षक रजनीश पटेल यांनी दिली. इतरांची ओळख पटवण्यासाठी ३६ तज्ज्ञांचं पथक दिवस रात्र डीएनए चाचण्या करत आहे.
या विमान अपघातातल्या मृत प्रवाशांच्या कुटुंबियांना आणि जखमींना २५ लाख रुपये तातडीची मदत द्यायचा निर्णय एअर इंडियानं घेतला आहे. टाटा समूहानं या आधीच मृतांच्या कुटुंबांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यायचा निर्णय घेतला होता. दरम्यान राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी बीजे रुग्णालयाला भेट देत अपघातातल्या मृतांना श्रद्धांजली अर्पण केली.

**<><><><><>**

एक पृथ्वी - एक आरोग्य यासाठी योगाचा अवलंब या संकल्पनेतून यंदाचा योग दिन २१ जून रोजी साजरा केला जाणार आहे. आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत आजपासून ग्लोबल योगा समिट - योगा कनेक्ट २०२५ या जागतिक शिखर परिषद होत आहे. या शिखर परिषदेचं उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं.

योग ही भारताची जागतिक कल्याणासाठीची देणगी असल्याचं  जाधव यांनी आपल्या भाषणात सांगितलं. यावर्षी योगदिनाचा मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशातल्या विशाखापट्टणम इथं होणार असून त्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

वैद्यकीय पदवी प्रवेश परीक्षा नीट २०२५ चा  निकाल जाहीर  झाला  असून त्यात महाराष्ट्राच्या कृशांग जोशीने तिसरा क्रमांक पटकावला आहे. राजस्थानच्या महेश जोशीने प्रथम क्रमांक तर मध्य प्रदेशच्या उत्कर्ष अवधियाने दुसरा क्रमांक मिळवला आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या ntaneet.nic.in या संकेतस्थळावर

तपशीलवार निकाल उपलब्ध आहे. देशभरातल्या ५५२ आणि देशाबाहेरच्या १४ शहरांमध्ये ४ मे रोजी आयोजित केलेल्या या परीक्षेला २२ लाखांहून अधिक उमेदवार बसले होते.

**<><><><><>**

झारखंडमधल्या चायबासा जंगल भागात आज नक्षलवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात केंद्रीय राखीव सुरक्षा दलाचा एक जवान मरण पावला आहे. झारखंड आणि ओडिशाच्या सीमाभागात दोन्ही राज्यांचे पोलीस आणि सीआरपीएफ ने राबवलेल्या संयुक्त शोधमोहिमेदरम्यान हा बॉम्बस्फोट घडवला गेला. झारखंडचे राज्यपाल संतोष कुमार गंगवार यांनी मृत जवानाप्रति शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

मणिपूर पोलिसांनी इतर सुरक्षा दलांसोबत काल रात्री राबवलेल्या शोध मोहिमेत ३२८ बेकायदेशीर शस्त्रं, काडतुसं तसंच हातबॉम्ब, उखळी बॉम्ब आणि दारुगोळा जप्त केला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून पाच दिवस सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून प्रधानमंत्री मोदी १६ जून रोजी कॅनडाच्या कानानास्किस इथं जी-७ परिषदेत सहभागी होणार आहेत. इथं ते जी-७ देशांच्या नेत्यांशी विविध विषयांवर चर्चा करतील, तसंच परिषदेच्या पार्श्वभूमीवर विविध द्विपक्षीय बैठकाही घेतील. शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी १८ जून रोजी क्रोएशियाला भेट देतील. भारताच्या प्रधानमंत्र्यांनी क्रोएशियाला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

**<><><><><>**

अमेरिकेसोबत अणुकरारासंबंधात चाललेल्या चर्चेतून इराणने अंग काढून घेतलं आहे. इस्त्रायलला अमेरिकेची मदत सुरू असल्यानं अमेरिकेशी चर्चा करण्यात स्वारस्य नसल्याचं इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी म्हटलं आहे. इराणने अणुकरार करून युद्ध थांबवावं, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुचवलं होतं. अमेरिका, ब्रिटन आणि फ्रांस सरकारने इस्त्रायलला कोणत्याही प्रकारची मदत करू नये. अन्यथा त्यांच्या लष्करी तळांवरही हल्ला करण्याचा इशारा इराणने दिला आहे. यामुळं पश्चिम आशियातल्या अमेरिकेच्या लष्करी तळांवरच्या काही अमेरिकन अधिकाऱ्यांना माघारी बोलावण्यात आलं आहे.

इस्त्राइलने इराणवर केलेल्या हल्ल्यांमध्ये इराणच्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यासह ७८ जण मारले गेले आहेत. इराणने इस्त्राइलवर केलेल्या प्रतिहल्ल्यात इस्त्राएलचे तीन जण मरण पावले असून अनेक जण जखमी झाले आहेत. इराण आणि इस्त्राएलचे विमानतळ नागरी वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. इस्त्राएलमधल्या तेल अवीव आणि जेरुसलेम सह अनेक शहरांमध्ये रात्रीदेखील इराणचे क्षेपणास्त्र हल्ले सुरु होते.

**<><><><><>**

हवाई दलाचे पायलट शुभांशु शुक्ला आणि इतर ३ अंतराळवीरांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात घेऊन जाणारं यान आता १९ जून रोजी उड्डाण करणार आहे. केंद्रीय अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी ही माहिती दिली आहे. खराब हवामान आणि यानातल्या तांत्रिक समस्येमुळे या यानाचं उड्डाण दोन वेळा पुढे ढकललं होतं.

**<><><><><>**

क्रिकेटची पंढरी अर्थात इंग्लंडमधल्या लॉर्ड्स स्टेडिअमवर आज दक्षिण आफ्रिकेचा कसोटी क्रिकेट कर्णधार टेम्बा बावुमा यानं आयसीसी जागतिक कसोटी

अजिंक्यपदाचा करंडक उंचावला आणि २७ वर्षांचा आयसीसी स्पर्धा न जिंकण्याचा दुष्काळ संपुष्टात आणला. गोलंदाजांनी वर्चस्व गाजवलेल्या या सामन्यात आपल्या झुंझार शतकी खेळीनं दक्षिण आफ्रिकेला आयसीसीचं जेतेपद मिळवून देणारा एडन मार्करम सामनावीर ठरला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- होल्ड - व्हाइस कास्ट --**

*यंदाचा जागतिक क्रिकेट कसोटी अजिंक्यपदाचा अंतिम सामना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झाला. नाणेफेक जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. आणि आफ्रिकेच्या गोलंदाजांनीही ढगाळ वातावरणाचा लाभ घेत हा निर्णय सार्थ ठरवला. कगिसो रबाडानं एकहाती ऑस्ट्रेलियाचा निम्मा संघ तंबूत धाडला आणि पहिल्याच दिवशी, ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव अवघ्या २१२ धावात रोखला. स्टिव्ह स्मीथ आणि वेबस्टरच्या अर्धशतकी खेळीनं ऑस्ट्रेलियाला काही प्रमाणत तारलं. गोलंदाजांच्या या चांगल्या कामगिरीनंतरही दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी ऑस्ट्रेलियावर वर्चस्व गाजवण्याची संधी गमावली आणि सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सच्या घातक गोलंदाजीसमोर दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव केवळ १३८ धावांतच गडगडला. स्वभाविकपणे पुन्हा एकदा विजेतेपदाच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा संघ कच खाणार अशीच परिस्थिती निर्माण झाली होती.*

*मात्र दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी पुन्हा एकदा चमकदार कामगिरी केली, दुसऱ्या डावात रबाडानं ४ तर लुंगी एन्गिडीनं ३ गडी बाद करत ऑस्ट्रेलियाला २०७ धावांमध्येच रोखलं. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियानं ७४ धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला दुसऱ्या डावात विजयासाठी २८२ धावांचं लक्ष्य मिळालं. आता विजयी लक्ष्य गाठण्याची जबाबदारी होती ती फलंदाजांची. दुसऱ्या डावात विजयी लक्ष्याचा पाठलाग आफ्रिकेचा सलामीवीर रिकल्टन अवघ्या सहा धावा करून माघारी परतला. मात्र त्यानंतर एडन मार्करम यानं आधी मल्डर याच्यासोबत अर्धशतकी, तर त्यानंतर कर्णधार बावुमा सोबत शतकी भागिदारी करत दक्षिण आफ्रिकेला विजयाच्या समीप पोहचवलं.... सामन्याच्या चौथ्या दिवशी मार्करम झुंझार १३६ धावा करून बाद झाला तर बावुमानं ६६ धावांची महत्वाची खेळी केली. अखेर मिशेल स्टार्क च्या गोलंदारीवर वेरेन यानं एक धाव घेत दक्षिण आफ्रिकेच्या अजिंक्यपदावर मोहोर उमटवली....*

**<><><><><>**

ISSF विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत आर्या बोरसे आणि अर्जुन बबुतानं सुवर्ण पदक पटकावलं. जर्मनीतल्या म्युनिचमध्ये १० मीटर एअर रायफलच्या मिश्र दुहेरीत त्यांनी ही कामगिरी केली. स्पर्धेतलं भारताचं दुसरं सुवर्ण आणि एकूण चौथं पदक आहे. यापूर्वी सुरूची सिंगनं सुवर्ण पदक पटकावलं असून सिफ्ट कौर समरा आणि एलावेनिलनं कांस्य पदक जिंकलं आहे.

**//<><><><><>//**